SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA, INDIA.
Students Facilitation Center.
Tele : Director, Board of Examinations & Evaluation : +91 231 2609068
Office : +91 231 2609411, EPABX +91 231 2609000
Website : www.unishivaji.ac.in ; online.shivajiuniversity.in, suk.digitaluniversity.ac
Email : coe@unishivaji.ac.in ,sfc@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004, महाराष्ट्र, भारत.
विद्यार्थी सुविधा केंद्र
दूरध्वनी क्र. : संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ – +91 231 2609068
दूरध्वनी क्र. : कार्यालय – +91 231 2609411 ईपीएबीएक्स – +91 231 2609000
संकेतस्थळ : www.unishivaji.ac.in ; online.shivajiuniversity.in, suk.digitaluniversity.ac
ई–मेल आयडी : coe@unishivaji.ac.in ,sfc@unishivaji.ac.in

Estd: 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र/एसयु/एसएफसी/277 दि. 23/09/2019

24 SEP 2019

**प्रति,**
**अधिविभाग प्रमुख/संचालक/प्राचार्य/समन्वयक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये व पदवी व पदव्युत्तर अधिविभाग,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**विषय : ऑगस्ट 2019 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कोल्हापूर,सांगली,सातारा या जिल्हयातील शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यालयातील पूरबाधीत गावातील/भागातील विद्यार्थ्यांचे नैसर्गिक आपत्तीमुळे, पुरामुळे शैक्षणिक कागदपत्रे खराब अथवा गहाळ झाली असल्यास विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत.**

संदर्भ : 1) दि. 30/08/2004 च्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव
2) शासनपत्र क्र.यूएआय/कोवी/पुरग्रस्त/विशी–1/10935 दि. 22/08/2019

**महोदय/महोदया,**

माहे ऑगस्ट 2019 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे ओढवलेल्या पूरपरिस्थितीतील कोल्हापूर, सांगली व सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पूरबाधीत गावातील/भागातील विद्यार्थ्यांची गुणतक्ते व इतर सर्व दाखले यांच्या दुबार प्रत विद्यापीठ स्थापनेपासून आज अखेर कोणतेही शुल्क न आकारता देण्याचे शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने निर्णय घेतला आहे.

उपरोक्त अधिकार मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की,

1) उपरोक्त क्र. 2 मधील सोबत जोडलेल्या मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करून कार्यवाही करण्यात यावी.

2) सदरच्या परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्यासाठी संबंधीत पूरबाधित विद्यार्थ्यांनी पूरबाधित/पूरग्रस्त असल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे शासकीय कागदपत्र/दाखला प्रत सादर करणे आवश्यक असून त्याची पडताळणी महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावी. या कागदपत्र पडताळणीसाठीचे अधिकारा मा. प्राचार्य/संचालक यांना देण्यात येत आहेत. त्यांनी या बाबतची कार्यवाही शासन निर्देशानुसार करावी.

3) पूरबाधित विद्यार्थ्यांनी उपरोक्तप्रमाणे गुणतक्ता अगर संबंधित कागदपत्रे गहाळ झाल्यास मागणी करताना अर्जासोबत पूरबाधित असल्याबाबत पोलीस दाखला/पंचनामा दाखला/सरपंच दाखला/तलाठी दाखला/महानगरपालिका/नगरपरिषद अथवा नगरपालिका दाखला व इतर कोणतेही पूरग्रस्त असल्याबाबतचे शासन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

4) सदरची प्रमाणपत्रे/दाखले माहे मार्च 2020 अखेर पर्यंत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनाच देण्यात येतील.

आपला विश्वासू

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**सोबत : वरीलप्रमाणे**

**प्रत : लेखा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**